महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/Intake Approval/२०२२-२३/ ५३e७ दिनांक : १८.११.२०२२

**महत्वाचे परिपत्रकः**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक
जा.क्र. २अ/एडीएम/२०२२/३८२ दिनांक १८.११.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भिय पत्रान्वये प्राप्त निर्देशांनुसार या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थेची माहिती **दिनांक ०५.१२.२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत** संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करावी. माहिती अद्ययावत करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सोबत संदर्भिय परिपत्रक आपल्या माहितीस्तव जोडण्यात येत आहे.

**सोबत : संदर्भीय पत्र.**

**(मारुती रा. जाधव)**
सहा संचालक (तां),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे - या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०
ई-मेल - desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/ ३८२ दिनांक : 18 NOV 2022

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ : १)संचालनालयाचे पत्र क्रमांक १०/एडीएम/Intake Approval/२०२२/५७८, दिनांक ११.७.२०२२
२)मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/ प्र.क्र.०७/ प्रवेश क्षमता तपासणी/ २०२२/ ११०१, दिनांक ६.७.२०२२
३) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचा दि. २.९.२०२२ रोजीचा ई मेल संदेश
४) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/०६/ केंप्रप्र/ २०२२/ १५३०, दिनांक १९.०९.२०२२
५) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/०६/ केंप्रप्र/२०२२/१६१०,दिनांक ४.१०.२०२२
६) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचा दि. १५.११.२०२२ रोजीचा ई मेल संदेश

वरील विषयाबाबत संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक २३ जुलै २०२२ रोजीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास कळविले होते. मात्र शिखर परिषदेची मान्यता,शासन मान्यता, विद्यापीठांचे संलग्नीकरण नसल्यामुळे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांना सदर माहिती अद्ययावत न करता आल्यामुळे संस्थांच्या मागणीवरुन माहिती सादर करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांच्या संदर्भीय दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या ई मेल द्वारे कळविल्यानुसार सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती दिनांक ५.१२.२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी.. माहिती अद्ययावत करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व

पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी,पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच आपल्या अधिनस्त सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दिनांक ५.१२.२०२२ सायं.५.०० वा.पर्यंत अद्ययावत करावी. त्यानंतर कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत/प्रमाणित करता येणार नाही व सदरील माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षास सादर करण्यात येईल.

प्रत : कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष) ,मुख्य कार्यालय मुंबई यांना माहितीकरिता